# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २९/०१/२०२२ (शनिवार)**

**(सकाळ)**

---

## चोरी

**१) पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— अंतर्गत ०५ कि.मी. अंतरावरील डेकोफर्न मल्टीप्रोजेक्ट प्रा.लि. कंपनी एमआयडीसी बोरी येथे दि. ०९/१२/२१ ते १९/०१/२२ चे ००.०१ वा. ते १४.०० वा. दरम्यान संशयीत आरोपीने नौकरीवरुन काढल्याचे कारणावरुन राग मनात धरुन फिर्यादी नामे— अंकित राजेशकुमार बागडी, वय ३१ वर्ष, रा. ८/१ अग्रसेन रोड गिरीपेठ, नागपूर यांचे बंद कंपनीचा दरवाजा उघडून कंपनीमध्ये ठेवलेले शिट मेकींग व डाईस आर्फ पंच प्रेस मशिन कि. ४,००,०००/— रु. चा मुद्देमाल चोरुन नेले. तसेच आरोपीने अंदाजे २६ लाख रुपयाचे कंपनीतील साहित्याचे नुकसान केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम ४६१,३८०,४२७,३४ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस उपनिरीक्षक श्री रामेश्वर राय मो.नं. ९९२३४२४७६७ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. खापा** :— अंतर्गत वाकी दरबार गेट पुढे येथे दि. २७/०१/२०२२ चे १३.१५ वा. दरम्यान फिर्यादी नामे— सौ सुनिता रामगोपाल शाहू वय ३० वर्ष, रा. मानकापूर ताजनगर गल्ली नं ५ हि नागपूर येथून वाकी येथे ताजूदीन बाबा दर्गा येथे आपले पती व कुटुंबासह वाकी दरबार येथे दर्शनाकरीता आली असता दरबारचे गेटजवळ गर्दीमध्ये अज्ञात आरोपीने फिर्यादीचे गळयातील मंगळसूत्र सोन्याचे किंमत ३५,००० /—रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार मुकुंदा लोंदे मो.नं.९३७०३२१६९५ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**